# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.06.2025** **वारःसोमवार**

---

•पुणे जिल्ह्यातील मावळमध्ये इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून चौघांचा मृत्यू; मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून प्रत्येकी पाच लाखांची मदत जाहीर

•उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टर अपघातात सात जणांचा मृत्यू; राज्यातल्या तिघांचा समावेश

•विदर्भ वगळता राज्यात सर्वत्र आज नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ; मुख्यमंत्र्यांसह मान्यवर करणार विद्यार्थ्यांचं स्वागत

आणि

•राज्याच्या विविध भागात आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा

**पूल**

पुण्यातील मावळमध्ये कुंडमळा इथं काल दुपारी इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल कोसळल्यानं चार पर्यटकांचा मृत्यू झाला असून, 51 जण जखमी झाले. तर सहा जणांची प्रकृती गंभीर आहे. घटनेची माहिती मिळताच पुणे आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, पोलीसदलासह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची दोन पथकं दाखल झाली. रविवारचा सुट्टीचा दिवस असल्यानं काल इथं पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. प्रमाणापेक्षा अधिक संख्येनं पर्यटक या पूलावर असल्यानं तो कोसळल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून, या दुर्घटनेमागील कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. या अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारनं पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन बचाव कार्याचा आढावा घेतला. जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च राज्य शासनातर्फे करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी योवेळी बोलताना दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून, घटनेची माहिती घेऊन राज्य सरकारला आवश्यक ती मदत देण्याचं आश्वासन दिलं.

**<u>रायगड</u>**

रायगड जिल्ह्यातील माथेरान इथं शार्लोट तलावात काल तीन युवक बुडाले अअसून त्यांचा शोध सुरु आहे. माथेरान शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या या तलावात पोहोण्यास मनाई करण्यात आलेली आहे. तरीही पर्यटक न जुमानता या तलावात पोहण्यासाठी उतरतात.

**<u>केदारनाथ अपघात</u>**

उत्तराखंडमधील केदारनाथहून गुप्तकाशीला निघालेले हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू झाला. काल पहाटे ही घटना घडली. मृतांमध्ये राज्यातल्या यवतमाळ जिल्ह्यातील वणी इथल्या जयस्वाल कुटुंबातील पती, पत्नी आणि त्यांच्या दोन वर्षांच्या मुलीचा समावेश आहे. दरम्यान, सुरक्षिततेच्या कारणास्तव या प्रदेशातील सर्व चार्टर आणि शटल हेलिकॉप्टर उड्डाणे तूर्त स्थगित करण्यात आली आहेत.

**<u>अहमदाबाद विमान अपघात</u>**

गुजरातमधील अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघातातील 62 मृतांची डीएनए चाचणीच्या साह्याने ओळख पटवण्यात आली असून, आतापर्यंत 35 मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आले आहेत. प्रवाशांची ओळख पटवण्यासाठी नातेवाईकांकडून आणि स्थानिक रहिवाशांकडून 250 रक्ताचे नमुने घेण्यात आले आहेत. दरम्यान, माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या निधनाबद्दल गुजरातमध्ये उद्या एक दिवसाचा राजकीय दुखवटा जाहीर करण्यात आला असून, रुपाणी यांच्या पार्थिवावर उद्या संध्याकाळी पूर्ण राजकीय सन्मानानं अंत्यसंस्कार केले जातील.

**<u>शाळा प्रवेशोत्सव</u>**

राज्यात विदर्भ वगळता इतर विभागांमध्ये आजपासून शाळा सुरू होत आहेत.

यंदा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालघर जिल्ह्यातील दुर्वेस इथल्या जिल्हा परिषदेच्या केंद्रीय प्राथमिक शाळेत, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाण्यातल्या किसननगर इथल्या मनपा शाळा क्रमांक २३ मध्ये तसंच शिवडी वडाळा इस्टेट इथल्या मनपा शाळेत उपस्थित राहणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार बारामती

तालुक्यातील काटेवाडी इथल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत, तर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे नाशिक जिल्ह्यातील तुंगण दिगरमधल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत करतील, अशी माहिती शालेय शिक्षण विभागानं दिली आहे.

**<u>लातूर</u>**

लातूरमध्ये जिल्हा शिक्षण विभागातर्फे पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकं, गणवेश, बूट, मोजे वितरित केले जाणार आहेत. विशेष म्हणजे पहिलीतील विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल अविस्मरणीय ठरावे यासाठी त्यांच्या पायांचे ठसे घेण्याचा विशेष उपक्रम राबविला जाणार आहे.

**<u>एसटीपास</u>**

एसटीनं प्रवास करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शासनातर्फे आजपासून 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही मोहिम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री आणि महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. या योजनेमुळं विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत वेळ घालवावा लागणार नाही. शाळा, महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून संबंधितांना त्यांचे पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत, असं सरनाईक यांनी सांगितलं.

**<u>गडचिरोली-</u>**

गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलग्रस्त भागातील आणि आर्थिक मागास कुटुंबांमधील १२० विद्यार्थी इस्रोला भेट देण्यासाठी काल विमानातून बंगळुरूला गेले. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा, वांगेपल्ली आणि नवेगाव इथं समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळांमधले हे विद्यार्थी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर या विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, यावेळी उपस्थित होते.

**<u>जिमाका</u>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नवीन महाबळेश्वर गिरिस्थान क्षेत्र आराखड्याच्या आढाव्याबाबत सातारा जिल्ह्यातील दरे इथं बैठक घेतली.

स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच 1153 चौरस किलोमीटरच्या क्षेत्रात या नव्या गिरिस्थानाची घोषणा करण्यात आली असून, त्यात २६५ गावांचा समावेश आहे. या क्षेत्रात पर्यटनवाढीच्या अनुषंगानं अनेक योजना प्रस्तावित आहेत.

**आषाढी वारी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचं २६ जून रोजी सातारा जिल्ह्यात आगमन होणार असून ३० जून रोजी पालखी सोहळ्याचा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश होणार आहे. यावेळी वारकऱ्यांना चांगल्या सोयी सुविधा मिळण्यासाठी शासकीय यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवून काटेकोरपणे जबाबदारी पार पाडावी, पालखी मार्गावरील सुरू असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे आदेश राज्याचे पर्यटन मंत्री आणि सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी काल लोणंद इथं झालेल्या आढावा बैठकीत दिले.

**पुणेमनपा**

दरम्यान, काल पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी खातेप्रमुख, पोलिस अधिकारी यांच्यासमवेत पालखी मार्गावरील कामांचा आढावा घेतला. रस्ते दुरूस्ती, झाडाच्या फांद्या छाटणे, अतिक्रमण काढणे, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवणे ही कामं विनाविलंब करावीत असे आदेश त्यांन दिले.

**नियंत्रणकक्ष**

आषाढी वारीसाठी राज्यातून आलेल्या भाविकांना आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. ऊर्मिला शिंदे यांनी सांगितलं. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर आरटीपीसीआर चाचणीची सोयही सरकारी आणि खासगी रुग्णालयात करण्याबाबतच्या सूचना दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**नांदेड आरोग्य विभाग**

आरोग्य विभागाच्या कायाकल्प योजनेत नांदेड जिल्ह्यानं राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्यातील ७० प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ४१ प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरस्कार मिळाला आहे. जिल्ह्यातील ५० टक्क्यांहून अधिक आरोग्य केंद्रांना हा पुरस्कार मिळाल्यानं नांदेड जिल्हा या योजनेत राज्यात अव्वल ठरला आहे. देगलूर तालुक्यातील मरखेल प्राथमिक आरोग्य केंद्राला २ लाख रुपयांचा प्रथम पारितोषिक मिळाले आहे, तर ४० प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रोत्साहनपर बक्षीस मिळाले आहे.

**<u>नाशिक मुक्त विद्यापीठ-पुरस्कार विजेते</u>**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या २०२३ साठीच्या शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार, ज्ञानदीप पुरस्कार, रुक्मिणी पुरस्कार आणि बाबूराव बागूल कथा पुरस्कार अशा चार पुरस्कार विजेत्यांची घोषणा काल करण्यात आली. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार यवतमाळ जिल्ह्यातील प्रा. डॉ. तक्षशीला मोटघरे यांना, ज्ञानदीप पुरस्कार कोल्हापूरचे डॉ. संजय रत्नपारखी यांना, तर रुक्मिणी पुरस्कार बदलापूर इथल्या दीपा प्रवार यांना जाहीर झाला आहे. बाबूराव बागूल कथा पुरस्कार पालघरच्या विवेक कुडू यांच्या 'चार चपटे मासे' या कथा संग्रहास घोषित करण्यात आला आहे.

**<u>अहिल्या नगर-अपघात</u>**

अहिल्या नगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात कोल्हार घोटी महामार्गावर काल सकाळी  खासगी कंपनीची बस आणि ट्रकच्या धडकेत तिघांचा मृत्यू झाला असून, सातजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर संगमनेर शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<u>नाशिक</u>**

नाशिक शहरात काल मुसळधार पाऊस झाला. सराफ बाजारातील काही दुकानांमध्ये पाणी शिरल्यानं व्यवसायिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. येवला तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्यानं शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील भागओहोळ इथं वीज पडून एका युवकाचा मृत्यू झाला.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं राज्यातील रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांसाठी पुढील २४ तासांसाठी अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे, तर पालघर, ठाणे, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट भागासाठी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. प्रशासनानं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल पथकांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**